नक्षलग्रस्त प्रभावित जिल्हयांसाठी केंद्रशासनाने सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षांकरीता जाहिर केलेल्या विशेष केंद्रीय सहाय्य (Special Central Assistance) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एनएएक्स ०११८/प्र.क्र.२०/विशा १ (ब)

दुसरा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक :- २० फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना:-

केंद्रीय गृहमंत्रालयाने डावी कडवी विचार सरणीचा (Left Wing Extremism) प्रतिरोध करण्यासाठी राष्ट्रीय धोरण व कृती आराखाडा (National Policy and Action Plan) तयार केला आहे. त्या अंतर्गत देशातील नक्षलग्रस्त प्रभावित जिल्हयांसाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षांकरीता विशेष केंद्रीय सहाय्य (Special Central Assistance) जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्हयात सदरहू योजना राबवण्याच्या सूचना केंद्रीय गृह मंत्रालयाने दिल्या आहेत. सार्वजनिक पायाभूत सुविधा व सेवा यामध्ये असणारी तफावत दुर करणे या योजनेचा मुख्य हेतू आहे. त्यासाठी राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर समिती गठीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानूसार राज्यस्तरावर राज्यस्तरीय समिती व जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. :-

शासन निर्णय :-

नक्षल प्रभावित जिल्हयांसाठी जाहीर केलेल्या विशेष केंद्रीय सहाय्य (Special Central Assistance) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

(अ) राज्यस्तरीय समिती :-

अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग.	अध्यक्ष
अ.मु.स./प्र.स./ सचिव (वने),महसूल व वन विभाग.	सदस्य
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग.	सदस्य
अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य सचिव

या योजनेसाठी केंद्र शासन सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाकरीता राज्यास प्रत्येक वर्षी निधी उपलब्ध करुन देणार असून या निधीतून घेण्यात येणा-या विविध योजनांना जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिल्यानंतर मंजूरीसाठी राज्यस्तरीय समितीकडे सादर करेल.

सदर योजनांना मान्यता दिल्यानंतर राज्यस्तरीय समिती मार्फत प्रस्ताव केंद्रीय गृह मंत्रालयास पाठविण्यात येतील. या योजनेतंर्गत घेण्यात येणा-या कामांच्या अंमलबजावणी बाबतचा अहवाल जिल्हास्तरीय समितीने राज्यस्तरीय समितीकडे नियोजित वेळेत पाठविणे आवश्यक आहे. या योजनेतील कामांचा आर्थिक व भौतीक आढावा घेण्यासाठी किमान तीन महिन्यातून एकदा राज्यस्तरीय समितीची बैठक घेणे आवश्यक राहील.

(ब) <u>जिल्हास्तरीय समिती</u> :-

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी	अध्यक्ष
पोलीस अधिक्षक	सदस्य
जिल्हा वन अधिकारी	सदस्य

विशेष केद्रीय सहाय्य (Special Central Assistance) योजनेतंर्गत जिल्हास्तरीय समितीस प्राप्त होणा-या निधीसाठी सार्वजनिक क्षेत्रातील (पब्लीक सेक्टर) बँकेमध्ये बचत खाते जिल्हाधिकारी यांच्या नावाने उघडणे आवश्यक राहील. या खात्यामध्ये होणा-या व्यवहारास जिल्हाधिकारी जबाबदार राहतील.

सन २०१७-१८- ते २०१९-२० या कालावधीसाठी केंद्रशासनाकडुन प्राप्त होणा-या निधीच्या तसेच अंमलबजावणी बाबत केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मार्गदर्शक तत्वे प्राप्त झाली आहेत. मार्गदर्शक तत्वाची प्रत या शासन निर्णयासोबत जोडली आहे.

या योजनेतंर्गत जिल्हास्तरीय समितीने कामांना मान्यता दिल्यानंतर ती राज्यस्तरीय समितीकडे पाठविणे आवश्यक राहील. जिल्हास्तरीय समिती या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामांच्या अंमलबजावणीबाबत जबाबदार राहील. तसेच या अंतर्गत घेण्यात येणारी कामे विहीत वेळेत पूर्ण करण्याची तसेच याबाबतचा वारंवार आढावा घेऊन त्याची माहिती सातत्याने राज्यस्तरीय समितीला देणे जिल्हास्तरीय समितीस बंधनकारक राहील. या योजनेअंतर्गत घेण्यात येणारी कामे संरक्षण विषयक तसेच अत्यावश्यक सेवेतील बाबीशी निगडीत असावीत. यासाठी जिल्हास्तरीय समितीने प्रत्येक कामांमध्ये दर्जा राहण्यासाठी घेण्यात येणा-या कामांची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक राहील. या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामांचे लेखापरिक्षण करणे देखीलआवश्यक राहील. यासंबंधात लेखापरिक्षकांने घेतलेले आक्षेप जिल्हाधिकारी यांनी राज्यशासनाच्या मार्फत केंद्रशासनाकडे या योजनेसाठी सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाकरीता मागणी करण्यात येणा-या निधीच्या प्रस्तावासोबत पाठविणे आवश्यक राहील. या संदर्भात या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ नुसार उपयोगीता प्रमाणपत्र (Utilization Certificate) पाठविणे जिल्हास्तरीय समितीस बंधकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२०१७१०२१६०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shashikant
Daji Shinde

Digitally signed by Shashikant Daji Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e8ff4601c954422b2375c147539b27f9d481d24af7a356e82ab2bee2b62d564a, serialNumber=979ddbb060e4bf1b0cedf8d4e1496dccc5679cd10d8a344810064c2f25f1c916, cn=Shashikant Daji Shinde
Date: 2018.02.21 16:32:30 +05'30'

(श.दा. शिंदे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग.
३) अ.मु.स. / प्र.स./सचिव (वने),महसूल व वन विभाग.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) प्रधान मख्य वन संरक्षक, (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य,नागपूर
७) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग.
८) जिल्हाधिकारी, गडचिरोली
९) पोलीस अधिक्षक, गडचिरोली
१०) जिल्हा वन अधिकारी, गडचिरोली
११) महालेखापाल (२) महाराष्ट्र राज्य, (ले.अ.) /(ले.प.), नागपूर
१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१३) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
१५) निवडनस्ती (वि.शा.१ ब).